सदैव तत्पर, सदैव मदतीस
दुरध्वनी क्र. २०८४९४८९
Email:spc.mumbaipolice@mahapolice.gov.in

पोलीस निरीक्षक तथा समन्वय अधिकारी,
स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम कार्यालय,
सशस्त्र पोलीस नायगांव, मुंबई ४०००१४.

जा.क्र. २८ /पोनि–समन्वय अधिकारी/S.P.C./स.पो.नायगांव/२०२४. दिनांक – २५/०४/२०२४

प्रति,

मा. अपर पोलीस महासंचालक सो,
प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :— Student Police Experiential Learning Programme या कार्यक्रमांतर्गत पोलीस ठाणे अधिकारी यांना सॅम्पल प्रोग्राम स्ट्रक्चर पाठविणेबाबत.

संदर्भ :— क्र.अ.पो.म.सं./प्रशि/आस्था–२/एसपीईएलपी/१४६/२०२३, दि. ११/१०/२३.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन सादर करण्यात येते की, भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रिडा मंत्रालय यांचे मार्फतीने पदवीपूर्व शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये Student Police Experiential Learning Programme मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण व खास पथके), म.रा.मुंबई यांचे अधिपत्याखाली बृहन्मुंबई पोलीस दलातर्फे राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबईतील पोलीस ठाणे स्तरावर (Hierarchy Level-3) ०५ पोलीस ठाण्यांकडुन (**https://yuva.gov.in**) युवा पोर्टलवर नोंदणी करण्यात आली आहे.

त्यानुसार Experiential Learning Opportunity (ELO) ची दुसरी बॅच प्रसिध्द करण्यात आली असुन युवा पोर्टलवर एकुण १० विद्यार्थ्यांचे ऑनलाईन ॲप्लीकेशन्स प्राप्त झाले आहेत. रजिस्ट्रेशन झालेल्या १० विद्यार्थ्यांचे Approval by NSS P.O. ची कार्यवाही होणेकरीता मुंबई जिल्हयातील एन.एस.एस. चे प्रोग्राम ऑफीसर (P.O.) प्राध्यापक श्री. सुशिल शिंदे आणि श्रीमती. क्रांती ऊके यांचेशी समन्वय साधुन ॲप्रुव्हलची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करुन घेत आहोत. त्यांच्यातर्फेही सदर कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे.

तसेच युवा पोर्टलवर नोंदणी केलेल्या ०५ पोलीस ठाण्यांना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना S.P.E.L.P. प्रशिक्षणाकरीता संलग्न केल्यावर पोलीस ठाणे स्तरावर पोलीस ठाणे इंचार्ज यांना द्यावयाच्या प्रशिक्षणाचे सॅम्पल प्रोग्राम स्ट्रक्चरची प्रत पाठविण्यात आलेली असुन सदरचा अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

To, Kranti Madam
Mumbai city DC

O.S.D., N.S.S
University of Mumbai

आपला विश्वासू,
Pawar
( संजय हं. पवार )
पोलीस निरीक्षक/समन्वय अधिकारी
स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम,
स.पो. नायगांव, मुंबई.

R 30/4/2024

**प्रत सविनय सादर** :—

१) मा. पोलीस उप आयुक्त तथा सदस्य सचिव, एस.पी.सी. प्रोग्राम, स.पो. नायगांव, मुंबई.
२) प्राध्यापक श्री. सुशिल शिंदे, (एन.एस.एस.) S.P.E.L.P. प्रोग्राम ऑफीसर (P.O.)

**सोबत** :— Experiential Learning Opportunity ची दुसरी बॅच प्रसिध्द करण्यात आलेल्या पो.ठा. ची यादी.

Student Police Experiential Learning Programme, Mumbai

Experiential Learning Opportunity (E.L.O.) ची दुसरी बॅच प्रसिध्द करण्यात आलेल्या पोलीस ठाण्यांची यादी.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | विद्यार्थ्यांच्या ॲप्लीकेशनची माहिती |
|---|---|---|
| ०१ | एल.टी. मार्ग पोलीस ठाणे | ०१ |
| ०२ | ताडदेव पोलीस ठाणे | ०२ |
| ०३ | मरीनड्राईव्ह पोलीस ठाणे | ०४ |
| ०४ | माटुंगा पोलीस ठाणे | ०१ |
| ०५ | शिवाजीपार्क पोलीस ठाणे | ०२ |